# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक १७/०२/२०२५ (सोमवार) संध्याकाळ**

---

## कोंबडयांची झुंज लावुन जुगार खेळणाऱ्यांवर गुन्हा नोंद.

**पोलीस स्टेशन कन्हान** :— दिनांक १६/०२/२०२५ रोजी कन्हान पोलीसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की प्रमोद हरदे यांचे घरासमोर भारत पेटोलपंप कांद्री च्या मागे ,कन्हान येथे कोंबडयाची झुंज लावून पैशांचा हारजितचा जुगार खेळत आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे कन्हान पोलीस घटनस्थळी पोहचले असता, प्रमोद रमेश हरदे यांचे घरासमोर खाली जागेत काही इसम कोंबडयांच्या पायाला धारदार काती बांधुन त्यांच्यी झुंज लावुन पैशांचा हारजितचा खेळ खेळतांना दिसुन आले. पोलीसांना पाहुन काही इसम पळुन गेले. आरोपी क्र १) प्रमोद रमेश हरदे आणि २) ताराचंद हिरालाल लोखंडे हे घटनास्थळी मिळुन आले. दोन्ही आरोपीच्या ताब्यातून रोख १७००/— रूपये, २) दोन विवो कंपनीचे मोबाईल २०,०००/—रूपये , ३) ४ कोबडे जख्मी अवस्थेत प्रत्येकी १५० रूपये प्रमाणे ६००/—रूपये, ४) २ लोखंडी धारदार काती प्रत्येकी ५० /— रूपये प्रमाणे १००/— रूपये असा एकुण — २२४०० /— रूपयाचा मुद्देमाल पंचासमक्ष जप्त केला आहे. आरोपी नामे १) प्रमोद रमेश हरदे ,वय ३९ वर्षे,रा भारत पेट्रोलपंप मागे कांद्री ,ता पारशिवणी ,२) ताराचंद हिरालाल लाखडे, वय ३९ वर्षे,वार्ड क्र ३ खापरखेडा,ता सावनेर, पाहीजे आरोपी ३) संजय मस्के, ४) अमोल कनोजिया ,५) सुभाष खडसे सर्व रा कांद्री ता पारशिवणी यांच्यावर पोलीस स्टेशनला १२ (ब) म. जु. का. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर